धन की बात

सकाळ

पुणे, सोमवार, ३ ऑगस्ट २०२०

# म्युच्युअल फंड योजनेची निवड कशी कराल?



अरविंद परांजपे

शेअरच्या भावावर जे घटक परिणाम करतात, ज्यांचा वेध घेणे सर्वसामान्य माणसाच्या आटोक्याच्या बाहेरील बाब असते. त्यांच्यासाठी म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्याचा सोयीचा आणि लाभदायी पर्याय आहे. पण त्यासाठीही अभ्यासाची गरज आहेच. २०१८ मध्ये 'सेबी'ने केलेल्या योजनांच्या वर्गवारीची मदत घेऊन तुम्हाला 'ॲसेट ॲलोकेशन' करता येते. त्याच्या पायऱ्या कशा असतात, ते पाहूया.

**A** **पोर्टफोलिओमधील इक्विटी/ डेट/ बॅलन्स्ड प्रकाराचे प्रमाण ठरवणे. (उदा. ५० : ३० : २०)**

**B** **इक्विटी विभागातील १० आणि हायब्रीड विभागात ६, डेट विभागातील १६ आणि अन्य विभागातील ४ मधून योग्य तो मुख्य प्रकार निवडणे. (उदा. इक्विटीमध्ये लार्ज कॅप)**

लार्ज कॅप प्रकारात सध्या ३५ योजना आहेत. या योजनांच्या कामगिरींमध्येही लक्षणीय तफावत असल्याने योग्य योजनेची निवड करणे सुद्धा सोपे नाही.

## योग्य योजनेची निवड करण्याचे निकष

म्युच्युअल फंड कंपनीची एकूण कामगिरी व त्यांचे व्यवस्थापन- विश्वासार्हता, चोख व्यवस्थापन, राबवत असलेल्या प्रक्रिया आदी निकषांवर ४० पेक्षा जास्त कंपन्यांमधील योग्य फंड कंपनीची निवड करता येते.

योजनेच्या फंड मॅनेजरची कामगिरी - फक्त स्टार फंड मॅनेजरवर विश्वास ठेवू नये. कारण अनेकदा नाव मोठे, पण कामगिरी सुमार, असा अनुभव येतो.

निर्देशांकाच्या आणि त्या श्रेणीतील योजनांच्या सरासरीच्या तुलनेत योजनेची कामगिरी बघणे महत्त्वाचे आहे. कारण आपण निवडलेल्या म्युच्युअल फंड योजनेने तुलनेला असलेल्या बेंचमार्कपेक्षा (उदा. निफ्टी/बीएसई १००) सरस कामगिरी केलेली असली पाहिजे.

'एसआयपी'साठी अधिक जोखीम असलेल्या योजनेची निवड करता येऊ शकते.

योजनेच्या परताव्यातील सातत्य - सर्वांत जास्त परतावा दिलेली योजना चांगली हा गैरसमज आहे. त्यासाठी जोखीम किती आहे, हे बघितले पाहिजे. शेअर बाजाराच्या चढत्या आणि पडत्या काळातही योजनेची तुलनात्मक कामगिरी सरस आहे का, हे तपासले पाहिजे. मात्र, म्युच्युअल फंडाचे चित्र बदलत राहत असल्याने लगेचच आपली योजना बदलण्याची घाई करू नये.

योजनेच्या पोर्टफोलिओतील 'कॉन्सट्रेशन' - खूप कंपन्यांचे शेअर असले तरी जोखीम कमी होतेच, असे सांगता येत नाही. तसेच थोड्या सेक्टरमध्येच जास्त गुंतवणूक आहे का, हे बघावे. अर्थात वॉरन बफेंच्या म्हणण्याप्रमाणे, कमी कंपन्या असलेला पोर्टफोलिओ चांगला परतावा देऊ शकतो, हे पण लक्षात ठेवावे.

फंड मॅनेजरचा विश्वास ग्रोथ किंवा व्हॅल्यू यापैकी कशावर आहे, हे बघणे जरुरीचे आहे. या दोन्ही पद्धतींना वेगवेगळ्या काळात यश मिळू शकते.

कोणती योजना सर्वोच्च परतावा देईल, हे आधी कोणालाही सांगता येत नाही. मागील काळात उत्तम कामगिरी आहे म्हणून पुढेही होईल, असेही सांगता येत नाही. तसेच पाच वर्षांपेक्षा जास्त मागील कामगिरीला फारसे महत्त्व देऊ नये. योजनेची निवड चुकली तर दीर्घकाळात आणि/किंवा मोठ्या रकमेवर जास्त नुकसान होऊ शकते. त्यामुळे वर्षातून किमान एकदा तरी योजनांचा आढावा घेऊन त्यात योग्य ते बदल केले पाहिजेत.

**(लेखक म्युच्युअल फंड सल्लागार आहेत.)**